जा.क्र.नांवाशमनपा/साबांवि/ 15753 /2019
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड
दिनांक : 29/01/2019

**कार्यारंभ आदेश**

प्रति,

**श्री राजेश जोशी,**
संचालक, SPEC Designers Pvt.Ltd.,
विवेकानंद,
नागपुर.

**विषय**:- नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम विकसीत करणे कामी सल्लागार नियुक्त करणे बाबत.

**संदर्भ**:- 1) ई-निविदा सुचना जा.क्र./नांवाशमनपा/साबांवि/8680/18 दि.29.09.2018
2) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./नांवाशमनपा/साबांवि/12975/2018 दि. 07.12.2018
3) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./नांवाशमनपा/साबांवि/13448/2018 दि. 15.12.2018
4) आपला E-mail दि.05.01.2019
5) आपणासोबत करण्यात आलेला करारनामा दि.24.01.2019

उपरोक्त विषयी संदर्भ क्र.1 च्या ई-निविदा सुचनेच्या अनुषंगाने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी विविध विकास कामांसाठी सल्लागार नियुक्त करणे या कामी निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर निविदा सुचनेनुसार आपण सादर केलेली निविदा अंतीम करण्यात येऊन महापालिकेच्या सल्लागार यादीमध्ये (Empanellement List) आपणास समाविष्ट करण्यात आले आहे. या बाबत संदर्भिय पत्र क्र.2 अन्वये आपणास अवगत करुन करारनामा करण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते.

संदर्भिय पत्र क्र.3 अन्वये केंद्र शासनाकडुन प्राप्त निधी अंतर्गत श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियम विकसीत करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व प्रकल्प व्यवस्थापन करण्याकरीता आपणाकडुन देकार मागविण्यात आला होता.

संदर्भ क्र.4 च्या E-mail द्वारे आपण उक्त कामासाठी सल्लागार शुल्क प्रकल्प किंमतीच्या 3.75% सेवा कराव्यतिरीक्त सादर केला आहे. त्यानुसार आपणास दिनांक 24.01.2019 रोजी सल्लागार शुल्क बाबत वाटाघाटी साठी पाचारण केले असता आपणासोबत दिनांक 24.01.2019 रोजी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार तसेच आपल्या पत्रानुसार खालील अटींवर उक्त कामासाठी कार्यारंभ आदेश देण्यात येत आहे.

1) सद्य: स्थितीत सल्लागार शुल्क प्रकल्प किंमतीच्या 2% नगर विकास विभाग शासन निर्णय संकीर्ण 2018/प्रक्र./54 /नवि16 दि. 04.06.2018 अन्वये व त्यामधील टप्प्यानुसार व अधिक सेवाकर महाराष्ट्र शासन सा.बा.विभाग शासन निर्णय क्र.-खाक्षेस/प्र.क्र.-209/रस्ते-9अ दि.24.01.2017 यास अधिन राहुन अदा करण्यात येईल.
2) श्री गुरु गोविंदसिंघजी स्टेडियमचा परिपुर्ण विकास करण्याच्या दृष्टीने सर्व समावेशक प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा.
3) निर्धारित सल्लागार शुल्क शासनाकडुन व मनपाकडुन वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल.
4) आपण मागणी केलेल्या अतिरीक्त 1.75% जास्त सल्लागार शुल्काबाबत शासनाकडे रितसर प्रस्ताव पाठवुन मान्यता प्राप्त झाल्यास निधी उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल.
5) सदर प्रकल्पाबाबत शासन व महापालिका स्तरावर वेळोवेळी अपेक्षित बाबींची पुर्तता करुन देणे बंधनकारक राहील.
6) सदर कामाचा परिपुर्ण प्रकल्प अहवाल 30 दिवस या कालावधीत पुर्ण करणे बंधनकारक राहील तसेच आपणासोबत झालेल्या चर्चेनुसार केंद्र शासनाकडुन प्राप्त निधी 42.00 कोटी मधुन उत्तर व दक्षिण पवेलियन ईमारतीचे अंदाजपत्रक, आराखडे तसेच निविदा पुस्तीका यासह 15 दिवस या कालावधीत सादर करावे.

**स्वा/-**

**(स्थळ प्रतिवर मा. आयुक्त यांची स्वाक्षरी असे)**

**आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड.

प्रतिलीपी :
1) **मा.महापौर,** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना माहितीस्तव सादर.
2) **मा.सभापती** , स्थायी समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना माहितीस्तव सादर.
3) **कार्यकारी अभियंता,(साबांवि)**,नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
4) **संगणक विभाग**, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड यांना देऊन कळविण्यात येते की सदरची प्रत nwcmc.gov.in या संकेतस्थळावर प्रकाशीत करावी.

**आयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड/करिता